# १. संक्षिप्त आढावा

## १.१ महाराष्ट्रातील गुन्हेगारी:

- वर्ष २००८ मध्ये ३ लाख २६ हजार गुन्हे दाखल झाले, वर्ष २००७ च्या तुलनेत त्यात (३.३%) वाढ झाली. दर ३ मिनिटास सरासरी २ दखलपात्र गुन्हे दाखल होतात.
- दर १ लाख लोकसंख्येमागे राज्याचे भा.दं. वि. गुन्ह्याचे प्रमाण १७७.३ आहे. सर्वाधिक प्रमाण नागपूर शहरामध्ये असून ते (३४७.०) आहे.
- दरोड्याच्या गुन्ह्यात वर्ष २००७ च्या तुलनेत वर्ष २००८ मध्ये (१३.३%) वाढ झाली. जबरी चोरीच्या गुन्ह्यात पुणे शहर, वाशिम व नंदुरबार येथे ६०% पेक्षा जास्त वाढ झाली.
- एकूण गुन्ह्यापैकी ३९.५% गुन्हे ९ मोठ्या शहरामध्ये दाखल झाले त्यात मुंबई शहराचा वाटा ४०.२% होता.
- २५ लाख ९९ हजार ७७१ (राज्याच्या लोकसंख्येच्या २.२%) भा.दं.वि.खटल्यांची सुनावणी विविध न्यायालयासमोर प्रलंबित आहे.
- वर्ष २००८ मध्ये राज्यात १४ हजार ३७४ व्यक्तींनी आत्महत्या केल्या तर १२ हजार ९५७ व्यक्तींचा रस्त्यावरील अपघातात मृत्यू झाला.
- राज्यात वर्ष २००८ मध्ये १६ हजार ९०९ वाहने चोरीस गेली त्यापैकी ८०% वाहने सापडलीच नाही.
- राज्यात दखलपात्र गुन्ह्यांपैकी दंगली, खुनाचा प्रयत्न, दरोडा, चोरी, आर्थिक गुन्हेगारी याचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे.

## १.२ स्त्रियां व बालिकांवरील वाढते अत्याचार:

- वर्ष २००८ मध्ये बलात्काराच्या गुन्ह्यात (७.४%) व स्त्रिया व मुलांच्या अपहरण व पळवून नेणे यात (३.२%) वाढ.
- स्त्रियांवरील अत्याचाराचे सर्वाधिक गुन्हे मुंबईत असून राज्यात या गुन्ह्यांचे प्रमाण१५.१०% आहे.
- महिलांवर पतीच्या नातेवाईकांकडून छळ, विनयभंग, लैंगिक छळ आणि बलात्कार या प्रकारच्या अत्याचारात सतत वाढ होताना दिसून येते
- वर्ष २००७ शी तुलना करता वर्ष २००८ मध्ये १० वर्षाखालील बालिकांवरील बलात्काराच्या प्रमाणात (१९.१९) सर्वात जास्त वाढ झालेली आहे.
- १८ ते ३० या वयोगटातील मुलींवरील बलात्काराची संख्या सर्वात जास्त असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत वर्ष २००८ मध्ये त्याचे प्रमाण ७.२८ % नी वाढले आहे.

## १.३ अनुसूचित जाती-जमाती वरील अत्याचार :

- अनुसूचित जाती  व जमाती वरील अत्याचारात प्रामुख्याने खून, बलात्कार, अपहरण, दरोडा व पळवून नेणे या स्वरुपाच्या गुन्ह्यात गेल्या ६ वर्षात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसते.
- अनुसूचित जातीवरील अत्याचारामध्ये, दरोड्यात (७५०%) वाढ झालेली आहे  तर खून (४४%), दुखापत (२४%), अपहरण (८५%) आणि बलात्कारात (१६%)  वाढ झाली आहे.
- अनुसूचित जाती व जमातीवरील विविध गुन्ह्यांपैकी जाळपोळ (३००%), दरोडा (२००%), व दुखापत (८०%), खून (३८%) आणि बलात्कारात (७%) वाढ झाली आहे.
- वर्ष २००७ च्या तुलनेत २००८ मध्ये अनुसूचित जमातीवरील अत्याचारात (१२.१३%) वाढ झालेली आहे.

## १.४ पोलिसांची दुरावस्था :

- संपूर्ण राज्यात १ लाखाच्या वर पोलिसांना निवासस्थाने उपलब्ध नाहीत.
- महाराष्ट्रातील ६७ टक्के पोलीस अधिकारी व ५० टक्के पोलीस कर्मचाऱ्यांना शासकीय निवासाची सोय नाही.
- वर्ष २००८ मध्ये कर्तव्यावर असलेल्या एकूण पोलिसांपैकी ५९.७३% पोलीस बेकायदेशीर जमावाने केलेल्या हल्ल्यात जखमी.
- राज्यात वर्ष २००८ मध्ये १ लाख लोकसंख्येमागे अहमदनगर येथे केवळ ५५, सोलापूर ग्रामीण येथे केवळ ५८ व कोल्हापूर ग्रामीण येथे केवळ ५९  पोलीस कार्यरत होते.
- महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी ६३ लाख एवढी असून प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ १ लाख ६५ हजार ६८३ एवढे आहे
- महाराष्ट्रातील प्रति १ लाख लोकसंख्येमागे केवळ १४२ पोलीस कार्यरत आहेत.

## १.५ अपुरी कारागृहे :

- एकूण दुय्यम कारागृहांपैकी ५८ कारागृहे (३३%) बंद आहेत.
- परभणी, बीड, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, नागपूर, अमरावती, अकोला, भंडारा, यवतमाळ, वर्धा, बुलढाणा, गडचिरोली आणि वाशिम अशा एकूण १४ जिल्ह्यात एकही दुय्यम कारागृह नाही.

*(स्त्रोत;: महाराष्ट्रातील गुन्हे २००८, माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती)*

# २. राज्य अर्थसंकल्पात गृह विभागाचे स्थान

*(आलेख क्र. १)*

**राज्य अर्थसंकल्पातील गृह विभागाचे स्थान**




| | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ६.३२ | ४.५७ | ४.४२ | ४.७५ | ५.२७ | ५.७४ | ४.७४ | ५.०५ | ५.२६ | ५.६३ |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*

- आघाडी शासनाच्या गेल्या १० वर्षांच्या काळात गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.१७ टक्के एवढा खर्च झाला.
- वर्ष २००८-०९ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च हा गेल्या १० वर्षाच्या ५.१७ टक्क्याच्या सरासरीत केवळ ५.०५ टक्के एवढा कमी आहे.

*(आलेख क्र. २)*

**गृह विभागावरील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च**




| | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ३७४८ | ३२३५ | ३४०१ | ३६२६ | ३९३७ | ४३६१ | ५३५१ | ४१९० | ५१७२ | ७२८६ |
| सुधारित अंदाज | ३७५६ | ३२३५ | ३४६७ | ३९८६ | ४२४८ | ५१८६ | ४१२८ | ५३३५ | ६५५२ | |
| प्रत्यक्ष | ३४८५ | २८१६ | ३१२९ | ३६३२ | ३९०८ | ४४५९ | ३९१२ | ५०८४ | | |

# पोलीस

*(आलेख क्र. ३)*




*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका)*

## गृह विभागावरील खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्च

*(तक्ता क्र. १)* *(रु. कोटीत)*

| वर्ष | गृह विभागावरील खर्च | पोलीस शीर्षावरील खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ३,४८५ | १,६५५ | ४७ |
| २००२-०३ | २,८१६ | १,७२८ | ६१ |
| २००३-०४ | ३,१५५ | १,९०१ | ६० |
| २००४-०५ | ३,६३२ | २,११८ | ५८ |
| २००५-०६ | ३,९०८ | २,३०४ | ५९ |
| २००६-०७ | ४,४५९ | २,५५४ | ५७ |
| २००७-०८ | ३,९१२ | २,९५७ | ७६ |
| २००८-०९ | ५,०८४ | ३,५८९ | ७१ |
| २००९-१०(सुअं) | ६,५५२ | ४,६४५ | ७१ |
| २०१०-११(अअं) | ७,२८६ | ५,९३९ | ८२ |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका)*

## ३. वर्ष २००८ मध्ये नऊ प्रमुख शहरात घडलेले गुन्हे

*(तक्ता क्र. २)*

| अक्र | गुन्ह्याचा प्रकार | राज्यातील एकूण गुन्हे | ९ शहरातील गुन्हे | ९ शहरांचे राज्यातील प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | खून | २,७९५ | ७२४ | २५.९० |
| २) | खूनाचा प्रयत्न | १,८३७ | ५५९ | ३०.४३ |
| ३) | सदोष मनुष्यवध | १११ | १३ | ११.७१ |
| ४) | बलात्कार | १,५५८ | ५३० | ३४.०१ |
| ५) | पळवून नेणे व अपहरण | १,३७९ | ५६५ | ४०.९७ |
| ६) | दरोडा | ८११ | १५७ | १९.३५ |
| ७) | दरोड्यासाठी तयारी करणे एकत्र येणे | २७४ | १६३ | ५९.४८ |
| ८) | जबरी चोरी | ३,०३१ | १४९४ | ४९.२९ |
| ९) | घरफोडी | १६,००४ | ७९३७ | ४९.५९ |
| १०) | चोरी | ५२,८६० | २८२०४ | ५३.३५ |
| ११) | गर्दी - मारामारी | ९,३८८ | २३१३ | २४.६३ |
| १२) | आर्थिक गुन्हेगारी | १,८८० | ९०९ | ४८.३५ |
| १३) | जाळपोळ | १,२८८ | १११ | ८.६१ |
| १४) | दुखापत | २९,७४२ | ९३९७ | ३१.५९ |
| १५) | हुंडाबळी | ३९० | ५१ | १३.०७ |
| १६) | विनयभंग | ३,६१९ | ९७१ | २६.८३ |
| १७) | छेडछाड | १,०९१ | ३६१ | ३३.०८ |
| १८) | पती किंवा नातेवाईकांकडून छळ | ७,८२९ | १८९८ | २४.२४ |
| १९) | अनैतिक संबंधांसाठी मुलांचा वापर | ० | ० | ० |
| २०) | निष्काळजीपणामुळे मृत्यू | १२,४७२ | २९८५ | २३.९३ |
| २१) | इतर भा. दं. वि. गुन्हे | ५०,१८३ | १७६७४ | ३५.२१ |
| **एकूण भा. दं. वि. खाली दखलपात्र गुन्हे** | | **१,९८,५४२** | **७७,०१६** | **३९.००** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे - २००८)*

- महाराष्ट्रातील नऊ मोठ्या शहरात पोलीस आयुक्तालय पध्दती आहे. सन २००८ ची या नऊ शहराची अंदाजित लोकसंख्या २ कोटी ४६ लाख ४ हजार इतकी आहे.
- यातील अमरावती शहराची लोकसंख्या सर्वात कमी म्हणजे ८ लाख १३ हजार इतकी आहे. तर सर्वाधिक लोकसंख्या मुंबई शहराची असून ती १ कोटी ३६ लाख ८६ हजार आहे.
- एकूण भा.दं.वि.गुन्ह्यापैकी ३९.४९% गुन्हे हे नऊ मोठ्या शहरामध्ये झालेले आहेत. मुंबई शहरात गुन्ह्याचे प्रमाण ४०.२३% इतके आहे.

# ४. भा. दं. वि.गुन्हे शीर्षकांतर्गत दखलपात्र गुन्हे

(वर्ष २००६-२००८)

*(तक्ता क्र. ३)*

| गुन्ह्याचे प्रकार | वर्ष | | | २००७च्या तुलनेत २००८ मधील वाढीचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| | २००६ | २००७ | २००८ | |
| खून | २,६५६ | २,६९३ | २,७९५ | ४ |
| खूनाचा प्रयत्न | १,६८० | १,६१५ | १,८३७ | १४ |
| सदोष मनुष्यवध | १०० | ११३ | १११ | -२ |
| पळवून नेणे व अपहरण | १,२६१ | १,३१२ | १,३७९ | ५ |
| दरोडा | ६६३ | ७१६ | ८११ | १३ |
| जबरी चोरी | २,५७४ | २,७७० | ३,०३१ | ९ |
| घरफोडी | १५,८७७ | १५,६०७ | १६,००४ | ३ |
| चोरी | ४६,४७३ | ४,७६८१ | ५२,८६० | ११ |
| दंगली | ७,४५३ | ७,९९३ | ९,३८८ | १७ |
| आर्थिक गुन्हेगारी | १,७२६ | १,७१५ | १,८८० | १० |
| जाळपोळ | १,१८८ | १,२६७ | १,२८८ | २ |
| दुखापत | २९,४०७ | २९,६२२ | २९,७४२ | ०.४० |
| **एकूण** | **११,१०५८** | **११,३१०४** | **१२,११२६** | **७** |

- राज्यात दखलपात्र गुन्ह्यांपैकी दंगली, खुनाचा प्रयत्न, दरोडा, चोरी, आर्थिक गुन्हेगारी याचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे.
- वर्ष २००७ शी तुलना करता २००८ मध्ये राज्यात तब्बल ७ टक्क्यांनी गुन्हेगारी वाढलेली आहे.

# ५. महिलांवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण

## ५.१ महिलांवरील अत्याचार

*(तक्ता क्र. ४)*

| अ.क्र. | गुन्हे | वर्ष २००६ | वर्ष २००७ | वर्ष २००८ | मागील वर्षाच्या तुलनेत झालेली वाढ (%) |
|---|---|---|---|---|---|
| १. | हुंड्यासाठी खून | १६८ | १९२ | १७५ | -८.८५ |
| २. | हुंड्यासाठी खुनाचा प्रयत्न | ९८ | १३५ | १४० | ३.७० |
| ३. | हुंडाबळी | ३८७ | ४३६ | ३९० | -१०.५६ |
| ४. | पळवून नेणे व अपहरण | ९२१ | ९६७ | ९९८ | ३.२१ |
| ५. | पतीच्या नातेवाईकांकडून छळ | ६,७३८ | ७,३५६ | ७,८२९ | ६.४३ |
| ६. | विनयभंग | ३,४७९ | ३,३०६ | ३,६१९ | ९.४७ |
| ७. | लैंगिक छळ | ९८४ | १,०३९ | १,०९१ | ५.०० |
| ८. | अनैतिक व्यापार | ३७८ | ३२२ | ३२७ | १.५५ |
| ९. | हुंडा प्रतिबंधक | ५५ | ४५ | ४९ | ८.८९ |
| १०. | बलात्कार | १,५०० | १,४५१ | १,५५८ | ७.३७ |
| | **एकूण** | **१४,७०८** | **१५,२४९** | **१६,१७६** | **६.०७** |

(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे २००८)

- राज्यातील महिलांवरील एकूण अत्याचारांपैकी सर्वाधिक गुन्हे मुंबई (९.३टक्के), अहमदनगर (५टक्के), ठाणे शहर (४.४ टक्के), पुणे व जळगाव (४.२ टक्के) या जिल्ह्यांमध्ये होतात.
- महिलांवर पतीच्या नातेवाईकांकडून छळ, विनयभंग, लैंगिक छळ आणि बलात्कार या प्रकारच्या अत्याचारात सतत वाढ होताना दिसून येते.
- मागील वर्षाच्या तुलनेत २००८ या वर्षात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण हे ६.०७ टक्क्यांनी वाढलेले आहे.

## ५.२ बालकांवरील अत्याचाराचे वाढते गुन्हे:

*(तक्ता क्र. ५)*

| अक्र. | गुन्हे | वर्ष २००६ | वर्ष २००७ | वर्ष २००८ | मागील वर्षाच्या तुलनेत झालेली वाढ (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बालकांचे खून | २०७ | २१३ | १७८ | -१६.४३ |
| २ | बालकांवरील बलात्कार | ६५५ | ६१५ | ६९० | १२.२० |
| ३ | बालकांना पळवून नेणे | ५५२ | ५९० | ५९८ | १.३६ |
| ४ | मुलींचा ताबा मिळविणे | १५ | १३ | १३ | ०.०० |
| ५ | वेश्या व्यवसायाकरीता मुली विकत घेणे | २३ | ३१ | २५ | -१९.३५ |
| ६ | भ्रुण हत्या | १० | १ | ०२ | १०० |
| ७ | इतर गुन्हे | १,१०१ | ९३२ | ९२० | -१.२९ |
| | **एकूण** | **२,५६३** | **२,३९५** | **२,४२६** | **१.२९** |

- बालकांवरील अत्याचारामध्ये बलात्कार आणि पळवून नेणे अशा प्रकारच्या गुन्ह्याचे प्रमाण सर्वात जास्त असून त्यात सतत वाढ होताना आढळते.
- मागील वर्षाशी तुलना करता वर्ष २००८ मध्ये बालकांवर होणाऱ्या अत्याचारात १.२९ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

## ५.३ बालिका व महिलांवरील बलात्काराचे वाढते प्रमाण:

*(तक्ता क्र. ६)*

| वर्ष | १० वर्षांखालील | १०-१४ वर्षे | १४-१८ वर्षे | १८-३० वर्षे | ३०-५० वर्षे | ५० वर्षांवरील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००७ | ९९ | १२५ | ३९३ | ६५९ | १६८ | १३ | १४५७ |
| २००८ | ११८ | १३५ | ४४१ | ७०७ | १६१ | ५ | १५६७ |
| वाढ | १९.१९ | ८.०० | १२.२१ | ७.२८ | -४.१७ | -६१.५ | ७.५५ |

- बालिकांवरील बलात्काराच्या प्रमाणात २००७ शी तुलना करता २००८ मध्ये ७.५५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.
- वर्ष २००७ शी तुलना करता वर्ष २००८ मध्ये १० वर्षा खालील बालिकांवरील बलात्काराच्या प्रमाणात (१९.१९) सर्वात जास्त वाढ झालेली आहे.
- १८ ते ३० या वयोगटातील मुलींवरील बलात्काराची संख्या सर्वात जास्त असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत वर्ष २००८ मध्ये त्याचे प्रमाण ७.२८ टक्क्यांनी वाढले आहे.

# ६. अनुसूचित जाती व जमातींच्या सदस्यांवरील अत्याचाराचे वाढते गुन्हे

## ६.१ अनुसूचित जाती:

*(तक्ता क्र. ७)*

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००३शी | २००७शी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००८ची % | २००८ची % |
| खून | १९ | १० | १५ | २१ | १६ | २३ | २१.५ | ४३.७५ |
| बलात्कार | ७२ | ६३ | ८३ | ८७ | ८० | ९३ | २९.१७ | १६.२५ |
| अपहरण व पळवून नेणे | ७ | ९ | ८ | ५ | १३ | २४ | २४२.८६ | ८४.६२ |
| दरोडा | १ | ६ | ५ | ११ | २ | १७ | १६००.०० | ७५०.०० |
| जबरी चोरी | ३ | ६ | ६ | ७ | ११ | ०६ | १००.०० | -४५.४५ |
| जाळपोळ | ५ | ११ | ७ | ९ | १९ | १० | १००.०० | -४७.३७ |
| दुखापत | ४१ | ५३ | ५२ | ५७ | ७८ | ९७ | १३६.५९ | २४.३६ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | ४३ | २६ | ३२ | ३६ | २० | २० | -५३.४९ | ०.० |
| अनु. जाती/ जमाती प्रतिबंधक कायदा | २१६ | २१९ | २५८ | ३५० | ३७० | ३३४ | ५४.६३ | -९.७३ |
| इतर गुन्हे | २९० | ३१२ | ३९९ | ४७० | ५५७ | ५६८ | ९५.८६ | १.९७ |
| **एकूण** | **६९७** | **७१५** | **८६५** | **१०६५** | **११६६** | **११९२** | **७१.०२** | **२.२३** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२००८)*

- ❑ अनुसूचित जातीवरील अत्याचारात प्रामुख्याने खून, बलात्कार, अपहरण, दरोडा व पळवून नेणे या स्वरुपाच्या गुन्ह्यात गेल्या ६ वर्षात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसते.
- ❑ वर्ष २००७ ची तुलना करता अनुसूचित जातीवरील अत्याचारात वर्ष २००८ मध्ये २.२३% ने वाढ झालेली आहे.
- ❑ अनुसूचित जातीवरील अत्याचारामध्ये दरोड्यात (७५०%) वाढ झालेली आहे तर खून (४४%), दुखापत (२४%), अपहरण (८५%) आणि बलात्कारात (१६%) वाढ झाली आहे.

## ६.२ अनुसूचित जमाती :

*(तक्ता क्र.८)*

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००३ शी २००८ ची % | २००७शी २००८ची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | | |
| **खून** | ८ | ६ | १० | ११ | ८ | ११ | ३७.५० | ३७.५० |
| बलात्कार | ३४ | ३८ | ४१ | ५६ | ४३ | ४६ | ३५.२९ | ६.९८ |
| अपहरण व पळवून नेणे | २ | ४ | ४ | ३ | ८ | ०७ | २५०.०० | -१२.५० |
| **दरोडा** | ० | ३ | १२ | ० | १ | ०३ | ३००.०० | २००.०० |
| जबरी चोरी | १ | १ | २ | ० | १ | ०१ | ०.०० | ०.०० |
| जाळपोळ | ४ | ७ | ० | ८ | २ | ०८ | १००.०० | ३००.०० |
| दुखापत | १२ | ११ | ७ | १८ | १० | १८ | ५०.०० | ८०.०० |
| अनु.जाती/जमाती प्रतिबंधक कायदा | ५० | ४० | ५२ | ५८ | ५४ | ४७ | -६.०० | -१२.९६ |
| इतर गुन्हे | १०६ | १२१ | १०७ | ११३ | ११२ | १२७ | १९.८१ | १३.३९ |
| **एकूण** | २१७ | २३१ | २२४ | २६७ | २३९ | २६८ | २३.५० | १२.१३ |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२००८)*

- गेल्या ६ वर्षात अनुसूचित जमातीवरील गुन्ह्यात सातत्याने वाढ झाल्याचे दिसते.
- वर्ष २००७ च्या तुलनेत २००८ मध्ये अनुसुचित जमातीवरील अत्याचारात १२.१३% वाढ झाली
- अनुसूचित जाती व जमातीवरील विविध गुन्ह्यापैकी जाळपोळ (३००%), दरोडे (२००%), व दुखापत (८०%), खून (३८%) आणि बलात्कार (७%) वाढ झाली.

# ७. पोलीस प्रशिक्षण खर्च

**(वर्ष २००८-०९)**

*(तक्ता क्र. ९)* *रुपयात*

| प्रशिक्षण संस्थेचे नाव | प्रशिक्षणार्थी | मंजूर अनुदान | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक | १,५४५ | १७,५५,५१,०७६ | ९,८२,६२,३९४ |
| गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक | १,१०३ | ४,०५,००० | १,६७,८७१ |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय, मरोळ | ३,२८१ | ४,१६,४४,९८५ | ३,८७,८३,४७९ |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा | माहिती प्राप्त झाली नाही | | |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय, अकोला | माहिती प्राप्त झाली नाही | | |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय, नानविज, दौंड | १,०४३ | २,८५,३४,०१९ | २,३६,९९,६२४ |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय,जालना | ३,१३८ | माहिती प्राप्त झाली नाही | |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय, सोलापूर | १,००८ | माहिती प्राप्त झाली नाही | |
| पोलीस प्रशिक्षण विद्यालय,नागपूर | माहिती प्राप्त झाली नाही | | |

*स्त्रोत : माहितीचा अधिकार २००५अन्वये वरील कार्यालयाकडून प्राप्त माहिती २०१० पर्यंतची प्रत*

# ८.पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांची माहिती

**(३१ डिसेंबर २००९ पर्यंत)**

## ८.१ मुंबईतील पोलीस निवास्थानांची स्थिती

*(तक्ता क्र. १०)*

| पोलीस घटक | प्रत्यक्ष संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | कमतरता |
|---|---|---|---|
| पोलीस अधिकारी | ५,१८५ | २,०६८ | ३,०९९ |
| पोलीस कर्मचारी | ३८,०५७ | १८,८५२ | १९,२०५ |
| **एकूण** | **४३,२४२** | **२०,९३८** | **२२,३०४** |

## ८.२ राज्यात १ लाखाहून अधिक पोलीस निवासस्थानांची कमतरता

*(तक्ता क्र. १०)*

| | संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | कमतरता |
|---|---|---|---|
| पोलीस अधिकारी | १६,६०४ | ५,४६६ | १११३८ |
| पोलीस कर्मचारी | १,६७,५१४ | ७५,९६३ | ९१५५१ |
| **एकूण** | **१,८४,११८** | **८१,४२९** | **१०२६८९** |

*(स्रोत: माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त माहिती.)*

- ❑ मुंबईतील २२ हजार पेक्षा जास्त पोलिसांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध नाहीत.
- ❑ मुंबईतील एकूण ६० टक्के पोलीस अधिकारी व ५० टक्के पोलीस कर्मचारी शासकीय निवासस्थानापासून वंचित आहेत.
- ❑ संपूर्ण राज्यात १ लाखाच्या वर पोलिसांना निवासस्थाने उपलब्ध नाहीत.
- ❑ महाराष्ट्रातील ६७ टक्के पोलीस अधिकारी व ५० टक्के पोलीस कर्मचाऱ्यांना शासकीय निवासाची सोय नाही.

# ९. नागरी हक्क संरक्षण कक्षातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे

**(डिसेंबर २००९ पर्यंत)**

*(तक्ता क्र. १२)*

| अधिकारी /कर्मचारी संख्या | मंजूर पदे | प्रत्यक्ष संख्या | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| अपर पोलीस महासंचालक | ०१ | ०१ | — |
| पोलीस उप महानिरीक्षक | ०१ | ०१ | — |
| पोलीस अधिक्षक | ०७ | ०३ | ०४ |
| पोलीस उप अधिक्षक | ०९ | ०४ | ०५ |
| पोलीस निरीक्षक | १९ | १५ | ०४ |
| सहाय्यक पोलीस निरीक्षक | ४६ | २१ | २५ |
| **पोलीस अंमलदार** | **१६९** | **१६९** | — |
| **एकूण** | **२५२** | **२१४** | **३८** |

*(स्त्रोत : माहितीचा अधिकार २००५अन्वये राज्य पोलीस मुख्यालयातील ही २०१० पर्यंतची प्रत)*

- नागरी हक्क संरक्षण कक्षातील एकूण ३८ पदे रिक्त असून त्यापैकी सहाय्यक पोलीस निरीक्षकासाठी असणारी २५ (६६%) पदे अजूनही भरली गेलेली नाहीत.

# १०. दुय्यम कारागृहांची सांख्यिकी

**( डिसेंबर २००८ पर्यंत)**

*(तक्ता क्र. १३)*

| जिल्हा | दुय्यम कारागृहांची संख्या | | | कार्यरत दुय्यम कारागृहांची माहिती | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कार्यरत दु.का | बंद दु. का. | एकूण दु. का. | कोठड्यांची संख्या | अधिकृत बंदी क्षमता | प्रत्यक्ष बंदी संख्या |
| पुणे | ९ | २ | ११ | २७ | १०६ | ३७ |
| सातारा | ८ | १ | ९ | १६ | ९४ | ३ |
| सांगली | ५ | १ | ६ | १३ | ६२ | ५६ |
| कोल्हापूर | ९ | १ | १० | २१ | १०५ | ८ |
| सोलापूर | ८ | ० | ८ | ३३ | २३० | २५७ |
| अहमदनगर | १२ | ० | १२ | ४५ | २२० | २१२ |
| औरंगाबाद | १ | २ | ३ | १० | १२ | १० |
| लातूर | ४ | ० | ४ | ११ | ८३ | ७३ |
| जळगाव | ११ | ० | ११ | ३८ | १९० | २४८ |
| नांदेड | १ | ४ | ५ | ३९ | १२ | ३९ |
| परभणी | ० | २ | २ | ० | ० | ० |
| बीड | ० | २ | २ | १५ | ० | १५ |
| धुळे | ३ | ० | ३ | ७ | ३९ | ४० |
| जालना | ० | ४ | ४ | ७ | ० | ७ |
| नंदुरबार | ४ | ० | ४ | १० | ११६ | १०८ |
| हिंगोली | ० | १ | १ | ९ | ० | ९ |
| उस्मानाबाद | ० | ३ | ३ | ९ | ० | ९ |
| नाशिक | १२ | १ | १३ | ३६ | १६९ | १५७ |
| नागपूर | ० | ४ | ४ | १२ | ० | ० |
| अमरावती | ० | ३ | ३ | ७ | ० | ० |
| अकोला | ० | ३ | ३ | ६ | ० | ० |
| भंडारा | ० | १ | १ | ३ | ० | ० |
| चंद्रपूर | २ | १ | ३ | ६ | २० | ० |
| यवतमाळ | ० | ४ | ४ | ८ | ० | ० |
| वर्धा | ० | २ | २ | ५ | ० | ० |
| बुलढाणा | ० | ५ | ५ | १० | ० | ० |
| गडचिरोली | ० | २ | २ | १ | ० | ० |
| गोंदिया | १ | ० | १ | ० | २१ | ० |
| वाशिम | ० | २ | २ | ४ | ० | ० |
| ठाणे | ६ | २ | ८ | १० | ५५ | ६ |
| रत्नागिरी | ६ | १ | ७ | १० | ३७ | २३ |
| सिंधुदुर्ग | ४ | १ | ५ | १० | ४८ | ११ |
| रायगड | ८ | ३ | ११ | २९ | १३२ | ६१ |
| **एकूण** | **१४४** | **५८** | **१७२** | **४६७** | **१,७५१** | **१,३८९** |

*स्त्रोत : माहितीच्या अधिकाराखाली मिळालेली माहिती - वर्ष २००८*

- एकूण दुय्यम कारागृहांपैकी ५८ कारागृहे (३३%) बंद आहेत.
- परभणी, बीड, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, नागपूर, अमरावती, अकोला, भंडारा, यवतमाळ, वर्धा, बुलढाणा, गडचिरोली आणि वाशिम अशा एकूण १४ जिल्ह्यात एकही दुय्यम कारागृहे नाही
- सोलापूर, जळगाव, अहमदनगर, नाशिक, नंदुरबार, लातूर आणि रायगड जिल्ह्यातील दुय्यम कारागृहातील बंदींची संख्या ही एकूण संख्येच्या ८० टक्के एवढी आहे.
- सोलापूर,जळगाव,नांदेड या जिल्ह्यांत अधिकृत बंदी क्षमतेपेक्षा बंदींची संख्या ७९ टक्क्यांनी जास्त आहे.

**दुर्लक्षित दुय्यम कारागृहे!**

बंद दुय्यम कारागृहांच्या खोल्यांच्या खिडक्या, दारे तुटलेल्या अवस्थेत असून संडास, बाथरुम तसेच वीज व पाण्याची सोय नाही त्यामुळे सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टिकोनातून बंदी ठेवणे धोक्याचे असल्याने काही दुय्यम कारागृहे सध्या बंद आहेत.

*(स्त्रोत : माहितीचा अधिकार २००५अन्वये कारागृह महानिरीक्षणालय पुणे. २०१० पर्यंतची प्रत)*

**कैद्यांच्या मुक्ततेसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनांना केराची टोपली :**

*कॉमन कॉज (एक नोंदणीकृत संस्था) विरुद्ध भारत सरकार या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात कैद्यांच्या मुक्ततेसंदर्भात पुढील मार्गदर्शक सूचना केलेला आहेत.*

१) तीन वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकेल अशा गुन्ह्यासाठी कैदी सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ तुरुंगवासात असल्यास व खटला एक वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्यास कैद्याची जामिनावर मुक्तता करण्यात येईल.

२) पाच वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकेल अशा गुन्ह्यासाठी कैदी सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ तुरुंगवासात असल्यास व खटला दोन वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्यास कैद्याची जामिनावर मुक्तता करण्यात येईल.

३) सात वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकेल अशा गुन्ह्यासाठी कैदी एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ तुरुंगवासात असल्यास व खटला दोन वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्यास कैद्याची जामिनावर मुक्तता करण्यात येईल.

४) वाहतूक संदर्भातील फौजदारी प्रकरण दोन वर्षाहूनही अधिक काळ प्रलंबित असल्यास संबंधित आरोपीस मुक्त केले जाईल.

५) न्यायालयाच्या संमतीने आपआपसात समझोत्याने मिटवता येईल अशा गुन्ह्याची सुनावणी दोन वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्यास, सरकारी वकीलांची बाजू ऐकून घेऊन न्यायालय संबंधित कैद्याला मुक्त करेल वा त्याला निर्दोष जाहीर करेल.

६) अदखलपात्र व जामिनपात्र गुन्ह्याचा खटला दोन वर्षाहूनही अधिक काळ प्रलंबित असेल तर सुनावणी न घेताच न्यायालय कैद्याची मुक्तता करेल.

७) ज्या गुन्ह्यासाठी केवळ दंडाची शिक्षा होऊ शकते, तसेच गुन्हा पुन्हा घडण्याजोगा नसेल व गुन्ह्याची सुनावणी एक वर्षाच्या आत सुरु झाली नसेल अशा गुन्ह्यातील आरोपीला मुक्त करण्यात येईल.

८) एक वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकेल अशा गुन्ह्याची सुनावणी एक वर्षाच्या आत सुरु झाली नसल्यास गुन्हेगाराला मुक्त केले जाईल.

९) तीन वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकेल अशा गुन्ह्याची सुनावणी दोन वर्षांपेक्षा अधिक काळ प्रलंबित असल्यास गुन्ह्यानुसार न्यायालय आरोपीस मुक्त वा निर्दोष मुक्त करेल व प्रकरण बंद करेल.

## ११. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे महाराष्ट्रातील तुरुंग व्यवस्थापनावर ताशेरे

१. तुरुंग व्यवस्थापनेच्या श्रेणी वाढ योजनेकरिता अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्राकडून रु.८ कोटी निधी मंजुर झाला होता. परंतू त्यापैकी केवळ रु.३ कोटी २२ लाख निधीच खर्च करण्यात आला या विलंबामुळे रु.४.७८ कोटीचा निधीच मिळू शकला नाही.

२. ३१ मार्च २००८ अखेर पर्यंत सुरक्षा कर्मचारी वर्गाच्या ३ हजार ७८२ मंजुर पदापैकी ५८७ म्हणजे (१६%) जागा भरल्या गेल्या नव्हत्या.

३. क्लोज्ड सर्किट टी.व्ही., हस्त आणि द्वार धातुशोधक, क्ष किरण शोधक यंत्रे इ. आधुनिक सुरक्षा साधन सामुग्री तुरुगांत बसविण्यात आली नव्हती.

४. मार्च २००८ अखेर, तुरुंग प्रशासनाच्या सुधारीकरण योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या कामांपैकी ३६ टक्के कामे प्रगतीपथावर होती तर ७ टक्के कामे सुरूच झाली नाही.

५. वर्ष २००६-०७ मध्ये सर्व तुरुंगातील एकूण क्षमता १७ हजार ७६७ असताना २५ हजार ८४५ कैदी कोंबण्यात आले होते. म्हणजे क्षमतेपेक्षा ७ हजार ९९८ कैदी जास्त होते.

६. केंद्र शासनाकडून राज्य शासनास डिसेंबर २००३ला स्वीकृतीसाठी पाठविलेली ‘आदर्श तुरुंग नियमावली २००३’, ऑगस्ट २००८ पर्यंत स्वीकारली गेली नव्हती.

७. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ९८ नुसार, सर्व आर्थिक व्यवहार घडताच त्यांची नोंद रोकड वहीमध्ये करावयाची होती आणि त्या नोंदी मुख्य अधिकाऱ्याने तपासणी केली म्हणून साक्षांकित करावयाच्या होत्या. तथापी असे लक्षात आले होते की, लेखापरीक्षणात चाचणी केलेल्या सोळा कार्यालयापैकी चार कार्यालयाकडून या सूचनांचे पालन करण्यात आले नव्हते.

८. महाराष्ट्र तुरुंग नियम पुस्तिका, १९७९ नुसार शासकीय भंडार, मालमत्येचे व तुरुंगाच्या रक्षणाकरीता प्राधिकाऱ्यांना हिंसाचार वा अशा तऱ्हेचा कोणताही विरोध निपटून काढण्याकरिता सशस्त्र रक्षकांची नेमणूक केली नव्हती.